म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २७७८



REFBK-0023490
REFBK-0023490

# निरालय

खलील मोमीन

२३- काव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४४८
२३४८०
काव्य ९६।३१८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ काव्य
२४४८
२३४९०
१६।३।८२

# निरालय

खलील मोमीन

REFBK-0023490
REFBK-0023490

चेतश्री प्रकाशन

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखकांना अनुदान योजनेखाली अनुदान मिळाले आहे.

NIRALAYA
(Marathi Poetry)
Khalil Momin

निरालय
(मराठी काव्यसंग्रह)
जानेवारी, १९८२.

o

प्रकाशिका
सौ. यशोदा सोनार,
चेतश्री प्रकाशन,
देशमुख चाळ,
अमळनेर (जि. जळगाव)

o

कॉपी राईट
सौ. साबेरा मोमीन,
७००, कोलांगडे वाडा,
मनमाड (जि. नाशिक)

o

मुखपृष्ठ
धनंजय गोवर्धने

o

रेखाटने
श्रीधर अंभोरे

o

मुद्रक
तापीराम चौधरी
मित्र प्रिंटिंग प्रेस,
नगरपट्टी, धुळे.

o

मुखपृष्ठ छपाई
फाईन प्रिंटस्, नाशिक.

o

मूल्य
बारा रुपये

शुद्धिपत्र

पृ. ५८ : वरून ७ वी ओळ – 'सगळे' ऐवजी 'सगळे'.
पृ. ६० : वरून १ ली ओळ – 'वंचति' ऐवजी 'वंचित'.
पृ. ६० : वरून १७ वी ओळ – 'सामजस्याने' ऐवजी 'सामंजस्याने'.

आदरणीय डॉ. म. सु. पाटील यांना –

आपण
माझ्या ' निरालय ' वेदनेसाठी
वृक्षच्छाया झालात,
म्हणून आयुष्य सांभाळता आले...

– खलील मोमीन

चलो अच्छा हुआ काम आ गई दिवानगी अपनी
वगरना हम दुनियाभरको समझाने कहाँ जाते ?

— कतिल सिफाही

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४७७
२३७८०
काव्य ९१।३।८२
सं. शाखा (स्थळ प्रत)

## आताशा शब्दही

क्षितिजापार झेपावते उफाळते शब्द
मी तुझ्यासमोर वाकविले.

फुलाला व्हावा सुगंधाचा भार
असे शब्द अलवार
ठेवले मी तिष्ठत उभे श्वास रोखून
तुझ्या सुगंधी स्वप्नांना पहारेकरी म्हणून !

कोमल फुलांचा सडा तू चिरडीत गेलीस
निर्दयपणे.
निखळले झुंबर
लाटांवर शकले होऊन...

आता दुरावल्या तितराचे पंख छाटलेले,
मनात असूनही डोळ्यांना घरटे परके,
आताशा शब्दही तुझ्यासारखेच पारखे...

## एका गाफील क्षणी

एका गाफील क्षणी. झुळझुळणाऱ्या झऱ्याकाठी
प्रतिबिंबांच्या सरमिसळीचे संदर्भ शोधताना
हरवलेला मी –
तडजोड करीत गेलो
फटकून वागणाऱ्या आयुष्याशी
आणि सगळ्याच वाटा
दिशांत हरवल्या...

मुक्तता होती आभाळाएवढी. पण,
झेप – नावापुरते पंख असलेल्या बदकासारखी !

आयुष्य नव्याने पहाटताना
रात्रीच्या गहिऱ्या जखमा
विसरायच्या म्हटलं तरी,
उदार फुलांनी
वाऱ्यावर उधळलेल्या सुगंधाचं काय ?

## अंतिम सत्य

नि:श्वासाच्या खोल तळाशी
थंड घन अंधारात –
माझ्या कवितांच्या आशयांना जोजवतात
अंतिम सत्याचे स्पर्श.
आणि रोमांचित होतात कविता माझ्या,
पहिल्या पावसाच्या शिडकाव्याने
आसुसल्या धरेसारख्या !

– जेव्हा मोहरून उठतील अंगभरून
शब्द-कळ्यांचे श्वास
तेव्हा वाऱ्यावर सांडलेला सुगंध
श्वासात सामावून ठेव ... काळीजभर.
नंतर –
पानपिकल्या देठात
वाऱ्याने मंतरलेले भैरवीचे कातर स्वर
ऐकणे आलेच !

## नक्राश्रू

हरिणीच्या काळजाने–
वैशाखवणव्याच्या वाळवंटातून
व्याकुळपणे धावताना,
सापडलेच असेल एक वेळ तुला
तुझेच तहानलेले ओॲसिस.
इथे माझ्या थंड निःश्वासांनाही आहेत शाप
अनवाणी होरपळणाऱ्या मृगजळाचे !

वाऱ्याची थंड झुळुक होऊन
देऊ नकोस मला
दिशांची ग्वाही.
फूल होऊन हसता हसता
पाहिलेत मी
पानांच्या नसानसांत कोरलेले
माझेच मृत्युलेख !

माझ्या भावनांच्या पांढुरक्या कबरीवर
ढाळू नकोस तुझे ताजमहाली अश्रू;
नाही तर–
कबर माझी पेटून उठेल
रंग घेऊन मावळतीचे ...... !

## तुझ्या आठवणी

उन्मळून कोसळणारे
काळे आभाळ
वाऱ्याच्या सतारीची
तुटलेली तार
दिलासा देणाऱ्या
दाही दिशा
गप्प गार...

इकडे तिकडे
पाणीच पाणी
उमाळे माझे
तुझ्या आठवणी...

## ते क्षणही...

ते क्षणही परागंदा झाले सुगंधासारखे.
त्यांनीही केली तुझ्यासारखीच हातमिळवणी
निसरडया आयुष्याशी...
तसा प्रत्येकजण आयुष्याशी बांधलेला
आणि आयुष्य क्षणांशी.
– एक अपरिहार्य प्रवास !
पण तुझ्यासोबत चालताता
पाऊले कशी दमदार होती,
आयुष्याच्या छाताडात रुतलेली !
आता रखडते जडशील एकटेपण,
आणि सोबत निश्चल क्षण... !!



## असहाय

काटचा–कुपाटचातून ठेचकाळत धावताना
जखमी वारा पेरीत जातो
माझ्या श्वासात
तुझ्या सुगंधी आठवणी,
आणि क्षितिजरेषेवर घुटमळणाऱ्या
माझ्या वठल्या आत्म्याला फुटतात
असंख्य आशांचे धुमारे...

असहायसा मी –
संध्याकाळची सावली होऊन
चाचपत जातो... मागोवा –
तुझ्या पाऊलखुणांचा.

थकली भागली सावली विसावते
रात्रीच्या पापणीत,
तेव्हा घायाळ वारा टाकीत असतो
शेवटचा निःश्वास
वैफल्याच्या दरीत...

## प्रतीक्षेत –

ऋतूच्या ओठी
विरले गाणे
वाराही विसरला
सुरेल तराणे.
गात्रपेटली
रात्र झुरते
क्षीण चांदण्यात.
कसे आवरावे
दाटता उमाळे
मेघाच्या वक्षात.
व्याकुळ सायंकाळ
अवघडले आभाळ
अस्तित्वाला माझ्या
प्रतीक्षेचे बळ …

## बिनधास्त

लंगडया आयुष्याला लावल्या जातात
' जर ' ' तर ' च्या कुबडया –
वर्तमान वाटेवर वावरताना.
म्हणजे अनायासेच ठेवता येतात हात
भूत–भविष्याच्या थडांवर
डळमळीत होताना.
निसरडया सरमिसळीत (खऱ्या–खोटयाच्या)
पाऊलवाटांवरून पळताना –
उरत नाही चवचाल चालीला चिंता
तोल जाऊन पडण्याची.
जिकडे पडले पाऊल
तीच आपली वाट,
ही एकच उक्ती तोंडपाठ !
चाल चुकली
म्हणजे समर्थनाची तोलकाठी हातात घेऊन
चाललेय् आयुष्य क्षणांशी संग करीत
बिनधास्त !

## तुझे अस्थिर पाय

तुझे अस्थिर पाय जमिनीवर असताना
माझे आभाळ तेवढे संदर्भहीन ?
तडजोडीला क्षितिजरेषा मोकळी आहे.
मध्यान्ही, भर आकाशातील सूर्य
तू न्याहाळू नयेस
हे उत्तम.
संध्याकाळी—
झाकोळत्या क्षितिजरेषेवर
एकदा तरी बघ डोकावून
चांदणी होऊन !

## सावली

उरलं सुरलं प्रेम प्राक्तनाच्या पोटातलं
दिवसा उजेडी उघडं केलं,
तेव्हा मिळविलं सावलीचं आश्वासन;
जायचे आहे मिसळून
शेवटी तिच्यातच म्हणून !

रात्रीच्या अंधारपंखांचा आधार घेऊन
उडालो... गाळीत एक एक आभाळव्यथा,
पण नाही दिसली सावली
अंधारात हरवलेली...
उत्तर रात्रीच्या पंखझडीत
उरली एकच खंत –
क्षितिजकंठाशी कातरवेळी
घुटमळणाऱ्या आर्त प्रकाशासारखी !

## दुस्वास

गहिवरली गळत्या कळीची कळ
तेव्हा झाली कवितेची ओळ न ओळ
नखशिखान्त व्याकुळ !
धरेच्या रंध्रारंध्रात साकळली व्यथा.
झुरणाऱ्या वाऱ्याचा
अनुभवताना श्वास –
नव्हते वाटले करशील तू
शब्दांचा दुस्वास...
आदिम ओढीच्या अनामिक पाऊलखुणा
पुसणार आहे मी
कवितालिहिल्या हाताने.
मातीची मुरवत न ठेवणाऱ्या वाऱ्याला
मग विचारू नकोस शब्दांचे अर्थ
गर्भार आकाशाच्या आपुलकीने...

## काळाचा तळ

फुलाचं फूलपण संपल्यावर
विझल्या स्मृतींच्या शोधार्थ
रेंगाळू नये जीर्ण पाकळयांनी
निर्विकार, अश्रांत कालप्रवाहाच्या
साक्षीदार किनाऱ्यावर.
– अशा वेळी फितूर किनाऱ्याच्या
सर्व संवेदनाच झालेल्या असतात
प्रवाहाबरोबर परागंदा...
उरतो फक्त ओसंडत्या प्रवाहाच्या आवाजाचा
आठवणींवर अत्याचार !
त्यापेक्षा द्यावे प्रवाहात झोकून...
फार तर –
राहतील तरंगत भग्नावशेष पृष्ठभागावर.
– असं तरंगतानाही
भर उन्हात,
स्वतःच्या सावलीने का होईना
चाचपता येतो –
काळाचा तळ !

## व्यभिचारात ..

वेलींवर विलसणाऱ्या निर्धारित प्रीतीच्या
अनावर ओढीला
दिलखुलास प्रतिसाद द्यावा म्हणून
प्रखर सूर्याला
मावळतीकडे झुकविले.
पण आदबी किरणांच्या नजरांचा मुजरा
नाकारला गेला ... व्यभिचारात
अस्ताव्यस्त पसरून;
– झुकण्यात माघार नसून
मार्दव असते हे विसरून !

उगवल्यापासून मावळेपर्यंत
किती तरी सूर्यमुखी नजरा
सूर्याला कुरवाळीत असतात.
– त्या नजरांचे गजरे माळून
वेलींनी रात्रभर प्रेमाचे संदर्भ शोधावेत
सूर्य नव्याने उगवेपर्यंत...

## अभंग दिवस

उगवणारा प्रत्येक श्रद्धाळू दिवस
करीत असतो
नियमित नमस्कार नतमस्तक होऊन
काळाला आळवीत.
बरसत असतो –
ऊन, वारा, पाऊस होऊन
तुकारामाच्या अभंगासारखा !

पण दगडी देवासारखे
संवेदनाहीन आयुष्य,
फासून बसलेले असते
काळाचा निर्विकार शेंदूर.

भक्तीच्या शक्तीला शरण जाताना
शेंदराची पुटे दूर सारून
अनंत उर्वरित आयुष्ये
टाकावीत ओवाळून
अभंग दिवसाच्या
प्रत्येक ओळीवरून !...

## जिवंतपणी मरण

श्वासांची लडिवाळ जवळीक
अचानक दुरावल्यावर,
तुझ्या-माझ्यातील अंधार
शब्दांनी सांधताना –
विरल्या सुरांच्या गर्तेत
आशय हेलावतात.
पंखाखाली प्रकाश विझविताना
उडणेही दुरापास्त !
– जरा पंख हलले तर न जाणो,
जपलेला अंधार एकाएकी पेटून उठायचा.
पुन्हा तीच, तुझ्याशिवाय,
आजन्म जगायची शिक्षा – प्रकाशभर...

आताशा माझ्या शब्दकळ्यांना
पहाटमायेने गोंजारत असते
तुझ्या गाण्याचे आर्ष स्मरण.
म्हणून मिटल्या पंखांनी
प्रकाशाला सामोरे जायचे,
पहात – प्रत्येक रात्रीसारखे
आपल्या कवितांचे
जिवंतपणी मरण...!

## वाताहत

झिगत जाणाऱ्या मेघांच्या मागे
रखडणारी व्याकुळ रानाची तहान
आणि –
भविष्याच्या भाळावर
कल्पनेने कोरलेल्या
साम्राज्याच्या सीमारेषेबाहेरून
धपापत धावणारे
शापित आयुष्य...
काय काय आठवायचे ?

खुणावणाऱ्या हिरव्या क्षणावर
खिळलेली नजर
विचलित करून पहायचे
म्हटले म्हणजे –
दयेहून मऊ अंधाराने
उघडचा जखमांना
कुरवाळणे आलेच !

## थोडीशी विश्रांती

आता आयुष्याचंच म्हणाल तर
भूतकाळ आपला.
आणि काही अंशी वर्तमान.
म्हणजे तोच हिशेबी कोडगेपणा...
भल्या-बुऱ्याची बेरीज-वजाबाकी !
पण हे जुगारी भविष्यापेक्षा बरं.
नाही तर –
रुजलेल्या अंकुराला आपण
आपल्या कल्पनेइतकंच वाढविलं असतं.
आणि तेही एक बरं की –
आपलं गतायुष्य पचविलं गेलंय्
काळाकरवी.
एरवी वर्तमानाच्या एकेका स्पंदनाची
चक्क आत्महत्त्याच !
तेव्हा –
सध्या मिळालेली थोडीशी सावली
विश्रांतीसाठी काय वाईट आहे ?

## तुझ्या प्रेमाखातर

गंधहीन फुलाचे सौंदर्य स्वीकारताना
स्वागतार्हच मला हे ओसाड आयुष्य,
तुझ्या प्रेमाखातर माझ्या सये...

कोमेजल्या कळ्या घेऊन
बहराला सामोरे जातानाचा प्रहर
तुझ्या डोळ्यात स्थिरावला;
तेव्हा दिशांनी माझ्या पंखांचा
आधार घेतला.
ओशाळल्या आभाळाला
तुझ्या मायाळू काळजात जागा देशील ?

अगदीच असह्य झाले तर –
सोपवणार आहे मी सर्व काही
ह्या मातीवर.
राहता राहिला तुझा प्रश्न;
तो तर अबाधितच आहे ... सुगंधासारखा !



## संकल्प

कलत्या चंद्रकोरीवर कोरलेले
रात्रीचे संकल्प
कसे असतात अल्पजीवी...

तसं एकूण आयुष्यच उजाड.
भकभकीत दिवसासारखं !
– भय त्याचं नाही.
रात्रीचा अंधार पांघरून
जखमा जोजवायचा सोसही नाही.

सायंकाळच्या सूर्याबरोबर
विरहाला विसर्जित करून
मोकळा झालो असतो
गळून पडलेल्या पिसासारखा !
पण मग –
फुटणाऱ्या पहाटेच्या कंठात
गाणं कोण गोवील ?

## निर्मोही

ऐलतीर ना पैलतीर
पाऊस धुवाधार,
पेरून बसलोय सभोवताली
काही शब्द अलवार...

कधी एखादा ऋतू हृदयात
अनाहूतसा वस्तीला आल्यावर
गच्च ओल्या अंधारात कितीदा
शल्ये झेलली तळहातावर !

का तरंगते तरीही जाणीव
जागृतीच्याच काठावर ?
काय उगवेल, अनिवार हा पाऊस
अचानक थांबल्यावर ?
हलके फुलके स्वप्न
की जुलमी यक्षप्रश्न ?

एक मात्र खरे :
झुगारून देऊन किनाऱ्यांचे सहारे
तू आयुष्योत्सुक अंकुरल्यावर
निर्मोही छायेत विसावणारी
माझी अबोध शब्दपाखरे
होतील एकाएकी अथांगतेत सैरभैर...

## प्रार्थना

पाखरांसाठी पानापानातून
प्रार्थना स्रवताना –
ओथंबलेल्या आभाळाने
कुणाला, कोणते आशिर्वाद द्यायचे ?

इथे तर दाही दिशा क्षमेहून शांत
आणि अपार श्रद्धेने भारलेला आसमंत !

आयुष्याची आसक्ती तेवढी फडफडतेय
वाऱ्याच्या बहकलेपणातून
आणि प्रार्थनेपूर्वीचे संभ्रम
व्यथित संध्येच्या कंपित रंगांतून...

विकल सुरातून याचना ओतप्रोत;
लुकलुकत्या नक्षत्रांना रात्रीची सोबत !

शिशिर चांदण्यात –
मातीचा कणन्‌कण मौन पांघरून
आणि निष्पर्ण वृक्षावरचा पक्षी
वेल्हाळ आभाळाचे आशीर्वचन
पिसापिसात जोपासून...

## हेतूंच्या हाका

वळणावळणावर गृहितांची वाताहत;
पुढे हेतूंच्या हाका अव्याहत...

सभोवती स्वतःत रमलेले माळरान;
मोसमी पक्षांना निरोप देऊन
बेचैन झालेले झाडाचे पिवळे पान.
धमन्यांमधून वाहणारी तुझी आठवण;
फांदीफांदीवर पाखराच्या विरहाचे व्रण !

प्रकाश कुरतडणारा प्रभासी उपदेश
आणतोय वाऱ्याला शहारा
येथील उध्वस्त प्रदेश...

वाटचालीत भूल पाडणारी चाहूल;
आशीर्वादाच्या मर्यादा संपल्याने
अडखळणारे प्रत्येक पाऊल...

ठरविलेय अशाही स्थितीत पुढे जाणे.
शोधीत –
पसार झालेल्या राजस पाखराच्या कंठातून
ओघळून पडलेले तुझे गाणे...

## मला पहायचेय

वाऱ्याने धैर्य एकवटावे
पिकल्या पानांच्या देठात;
आणि झाडाला झिडकारताही येऊ नयेत
स्वत:ची जीर्ण कलेवरे...

अशावेळी –
आकाशाने आश्चर्य व्यक्त करून
पक्षांचा प्रश्न निकालात काढावा.

पाचोळा आणि गळून पडलेल्या पिसांशी
नाते नाकारणारी माती,
मग कोणत्या दिशेत सुगंध
हरवून बसेल
याचे अंदाजही फुलपाखरांवर सोपवू नयेत.

याउपरही –
फुले फुललीच तर
पाकळ्यांवर दंव सांडून
कोणते आभाळ द्रवणार आहे
हे मला पहायचेय...



## तिच्या डोळ्यात

ऐन दिवेलागणीला
कोणते दुःख तिच्या डोळ्यात विझत जाते ?

माझी प्रत्येक सांज वांझ, म्हणून
दिवसा–उजेडीच पेटवून ठेवतो शब्द;
रात्री, तिच्या नजरेतून पाझरणाऱ्या
प्रकाशात सोडण्यासाठी...
पण कितीही श्वास रोखले तरी
विझत जातो एक एक दिवा
प्रवाहात वहात ... डोळ्यादेखत !

उत्तररात्री –
अर्धोन्मीलित कळ्या घेऊन
धुक्यातून वाट काढीत
तिच्या पापणीच्या काठी यावे
तर डोळ्याचा तळ नितळ.
किनाऱ्यावर –
मीच सोडलेल्या विझल्या दिव्यातून
फुटणारी पहाट
आणि ओंजळीतल्या कळ्या खुलून
सुटलेला घमघमाट...

## खात्री नसूनही –

खात्री नसूनही प्रत्येक रात्री
पडताळीत गेलो
आयुष्याचे चढ–उतार...

खरे तर, सुख आणि दुःखाचे
नेटके अंदाजही
बांधता आलेलें नाहीत.

संध्येलाच पहाट समजण्याचे खूळ
जिथे मूळ धरून आहे मनात
तिथे –
दुःख आणि सुखाचे नेमके अर्थ
रात्र किंवा दिवसाशी ताडण्याचे कारण काय ?
की, केवळ भावनांचे ओझे आयुष्यावर लादून
सुचलेली ही पोकळ तर्कसंगती ?

– हे सर्व विसंवाद मातीला अभिप्रेत आहेत
असे मानले तरी,
आयुष्याचा प्रश्न उरतोच.
त्याला ना होता येते काळ
ना आभाळ...

## तडे

माझ्या हिरमुसल्या हिमार्त निःश्वासावर
जराही विश्वास न ठेवून
वाऱ्यानें उत्साहाने साजरे केलेले
तिच्या श्वासाचे उत्सव – पैलपार...
प्रकाश नाकारून –
मातीला सावरायला सरसावलेल्या
सावलीच्या अगतिकतेने
मी न्याहाळतो माझा ऐलतीर.

जागोजाग दिसतात –
माणुसकीचे खचलेले खांब
आणि श्रद्धेला आरपार गेलेले तडे...
काही डागडुजी करावी म्हणून
प्रेमाच्या आकांताने लिंपतो
आतल्या भिंती;
पण वरच्या मोकळ्या छतातून
पाझरणाऱ्या प्रकाशथेंबांनी
सुटत राहतात
बोलघेवड्या शब्दांचे पोपडे
कविता होऊन !

दोन्ही काठांना जोडणाऱ्या पुलासारखे
आयुष्य समोर असूनही
मी नाकारतो प्रवाह
कवितांना कवेत घेऊन...

## सवय

पचविला प्रत्येक आघात;
उघडया डोळयांनी
उल्कापात बघणाऱ्या
आकाशाच्या सोशिकतेने.
तरीही –
रोज रात्री
तारे मोजायची सवय
काही केल्या जात नाही !

## नैराश्य

आला क्षण रंगवताना
संध्येची स्पंदने चाचपावी लागतात
हे तिला का पटत नाही ?

समर्थपणे तिने पहाट पेलली
तेव्हा अंधाराच्या औदार्याखाली
गुदमरत असतानाही
मी तिला बहाल केली
रक्तपेशीतली लाली...

आता बहर ओसरू लागल्यावर
ती, हवालदिल झऱ्याकाठी
प्रतिबिंबांच्या आठवणींचे
आर्जवी गीत आळवीत असते.
आणि विचारीत बसते मोसमी पक्षांना
स्थलांतराचे अर्थ...



## रस्ते

आशा–आकांक्षांचे शिरस्ते
चुकवीत चालणारे रस्ते
अडवितात पात्रलोपावली
तेव्हा विचलित होऊन
आपण जातो विसरून
ते भोगीत असलेले
दिशांचे शाप.

कधी तरी रस्त्याच्या दगडी मनातही तरळते
पक्ष्यांच्या पंखांचे स्वप्न ;
जे केवळ आभाळाच्या पोकळीतच
दरवळत राहते मुक्तपणे...
ते साकार होण्याचे साक्षात्कार
होत नसलेली आपली पाऊले
एव्हाना येऊन ठेपलेली असतात
निर्णायक सीमारेषेवर;
जी ओलांडताना –
सुरवातीलाच लागते
एक कणाहीन वळण ...
आणि पुढे
अस्ताव्यस्त रस्ते,
ज्यांच्या लेखी नसते
आपल्या अस्तित्वाच्या पाऊलखुणा जपणे.

## प्रयोग

प्रेमाच्या प्रयोगशाळेत
व्यथेची उकल करून दाखवायचा
आग्रह तिने धरला.
तेव्हा तल्लीन होऊन
मी घेत गेलो शोध…

रंग–रूप–गंध तर सोडाच,
पण आयुष्य अगदी सहजपणे
निघून गेल्याची कोणतीही खूण
मी तिला दाखवू शकलो नाही.
ती माझ्याकडे
आणि मी जमिनीकडे पाहत राहिलो फक्त.
त्या संध्यामग्नवेळी –
मातीचा कण
एका क्षणाशी संगनमत करून हसला.

शेवटी ––
कोणताही प्रयोग करायचा
म्हटला म्हणजे,
योग जुळून यावा लागतो
एवढेच मी तिला पटवू शकलो.

## आता फक्त

आयुष्यावर चढत गेलेले
दिवस–रात्रींचे थर
कातडीसारखे सोलून काढले,
आणि ऊन–सावलीचा स्पर्श
न होऊ देता वाळत ठेवले.
पण –
वाऱ्याच्या जराशा शहाऱ्यानेच
ते विरून गेले...

वेदनेचा अंत जवळ आला म्हणजे
वासनेचे पंख तिला फुटतात;
हे –
उरलेले आयुष्य
समाधानाच्या कोषात ठेवण्यापूर्वीच
लक्षात आले !

आसक्ती आपली पाळे-मुळे
मातीत खोलवर रोवून आहेच.
आता फक्त –
आभाळ फाटायची
वाट पहायची...

## कैफियत

आपल्या असण्या–नसण्याचे संदर्भ
फुलांनी सुगंधात प्राण ओतण्याशी जुळल्यासारखे वाटले
तरी –
आपल्या अस्तित्वाच्या कोषाला
स्वप्नांची छिद्रे असतात.
त्यातून किती तरी अंधार भळभळतच असतो.
कोणी झोपेत कूस बदलली
म्हणून रात्र उलटी होत नाही.
ह्या पायंडा पडलेल्या
व्यर्थाच्या वाटा तुडविताना –
कळ्यांच्या खुलण्याची सहजता
तर्काला पटणारी असली, तरी पावसांना पेलणारी नसते.
– ह्या जगात
जगण्याची कैफियत फक्त
मृत्यूलाच ऐकू येते !



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

## चार कविता : दुपारच्या

: १ :

दुखरी दुपार पसरत जाते रानभर
तेव्हा पाखरांच्या गाण्याला आलेली ग्लानी
वेदनेइतकी होत जाते गहन.
अवधान झडून गेल्यागत
झाडे असतात निमूट, शांत
आतले कल्लोळ आवरीत.
गवताची लाहालाहा तगमग
सर्वदूर...
– आयुष्याने सर्वांगाने घेतलेला
वेदनेतील सहभाग
सर्वत्र भरून.
रानही आता सज्ज
आपल्या साऱ्या संवेदना एकवटून !
मग मात्र दुपार
इतर प्रहरासारखी सरकत जाते
वेदनेच्या नव्या आविष्काराचा
प्रवास होऊन...

: २ :

दुपार –

आपल्या अपार श्रद्धेला

भेदून जाते आरपार;

तेव्हा अवघे अस्तित्व गोळा होते

वेदनेच्या पृष्ठभागावर.

दुःखाच्या सैल काठांना

कोठवर धीर देणार ?

सगळे सहारे दुरावल्याने

उदास सहाऱ्यासारखा चेहरा

न्याहाळावा तरी कशात ?

– असे प्रश्नच तेवढे परावर्तित होतात

आकाशाच्या आरशात...

: ३ :

उत्फुल्ल सकाळ

पाकोळीच्या पंखांनी उडून गेली

आणि आक्रमक पवित्र्यात उभी ठाकली

दुपार.

रंगाचा बेरंग होतो आहे

ह्या जाणिवेलाच चिरीत राहिली

आपल्या धारदार नजरेने.

फुलांचे रंग, नाजूक तरंग

करपून जातात.

एक बरे की नंतर –

संध्याकाळ येते, रात्र होते.

नाही तर –

या दुधखुळ्या आयुष्याने

स्वप्नें पहायचेही
सोडून दिले असते !

: ४ :

दुपार –
आपले अत्याचारी फास
पसरवीत फिरते रानोमाळ;
तेव्हा भुईला भेगा पडतात –
विदीर्ण हृदयासारख्या.
अशा वेळी –
सावली माऊलीचा पदर होऊन
मातीला धीर देत राहते...

## ज्यांच्यासाठी

या प्रदेशात –
बहर कोणत्या प्रहराचे पैंजण बांधून
रुणझुणत येतील
याचे अंदाज बांधीत
अस्वस्थ होऊन सूर्यास्ताबरोबर
प्राण गहाण टाकून पाहिले.
आशेला अंधाराची धास्ती वाटेल
म्हणून निबिड रात्री
काजव्यांचे दिवे
रातकिड्यांच्या तालावर
तळमळत ठेवले.

– हे सर्व ज्या पाखरांसाठी केले
ती अंधाराचा फायदा घेऊन
पसार झाली !

मग मात्र रात्र सरताना –
सोशिकतेचा कंठ
पहाटेइतका दाटून आला.
एक एक तारा
तुटक्या पैंजणातील घुंगरासारखा
नादहीन होऊन विझला.
आणि माझ्यासकट येथील उजाड प्रदेशाला
प्रत्येक प्रहराचा दाहक घोट
दिवसा–उजेडी पचवावा लागला...

## जगणे येथले

विजनाच्या दारी  गळालेले पंख
वेदनेचा डंख  श्रांत वाता ।।

दाटलेला ऊर  पापण्यात पूर
वाहतात दूर  येथे वाटा ।।

पोळलेला माळ  मोकळे आभाळ
मध्यंतरी कळ  सर्व काळ ।।

जगणे येथले  मृगजळी भास
फक्त तुझा ध्यास  माझ्या मना ।।

## प्रवास

पटलेल्या गोष्टीची खूणगाठ
विस्मृतीच्या किनाऱ्याला जाऊन भिडेपर्यंत
मोहरत येणाऱ्या लाटांसाठी
कंठी दाटलेल्या गाण्या-हुंदक्यांना
आवरून धरणे –
धीरोदात्त सागराला
कसे जमत असेल ?

होडीतून चाललेला आपला प्रवास...
हातातल्या वल्ह्यांवर
आणि पुढच्या अथांगतेवर
आपली दारोमदार.

चहूकडे पाणी...
आपली होडी तेवढी कोरडी !
या समाधानात आलेला किनारा;
आणि शेवटी –
सहीसलामतपणे प्रवास संपल्याचा सुस्कारा...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## समजून संत ज्यांना

समजून संत ज्यांना आम्ही सलाम केले,
नकली महंत होते, ढोंगात डुंबलेले !

कळला कधी न आम्हा त्यांचाही गूढ कावा,
चुकवून वाट त्यांनी आम्हास दूर नेले...

लपवून खंत सारी गाण्यात धुंद होता,
सगळ अभंग त्यांनी मोडीत काढलेले.

विसरून जात होतो आम्ही अपार दुःखे,
श्रद्धेवरीच घाला घालून तेच गेले.

उमजू कधी न शकलो त्यांची चलाख रूपे;
लपवून पाप त्यांनी आम्हास मूक केले.

फुलवू तरीही, आशा होती मनात मोठी,
तोडून बाग त्यांनी ओसाड रान केले...

## निरालय

शांत निद्रिस्त असतात
येथल्या धर्मग्रंथांची पाने
ह्या सनातन दु:खांचे स्पर्श टाळून.

वणवे पेटण नवे नाही, असे–
किनाऱ्याच्या आडोशाला राहून
सांगतो सागर आवेशाने गर्जून.

काळोख्या रात्री एखादा तारा
उन्मळून कोसळला
तरी पहाटेचे हसू
दाबू शकत नाही
उगवणारा दिवस हिरमुसून.

आणि पाखरे गेली उडून
म्हणून मातीत रोवलेली मुळे घेऊन
जाऊ शकत नाही झाड
दूर पळून.
कारण–
इथे सर्वांनाच माहीत झालेय
आयुष्य वेदनेपुरते तरी असते निरालय !

## उघड दार

कुठल्या सात्त्विक समाधानाच्या शोधात
विरघळताहेत संध्यारंग पाण्यात ?
कसले निरोप घेऊन
परत फिरली आहेत पाखरे ?

प्रवाहाच्या काठावर उभे असलेले झाड
वाऱ्याची लहर सांभाळून
देईल निवारा
निरोप आणणाऱ्या पाखरांना.
अन् काळोख ओलावल्यावर
देवळाच्या कळसावर आळसून टेकलेले आभाळ
पाखरांसाठी निळी स्वप्ने
झाडाच्या झोळीत टाकीलही कदाचित्...
किंवा कदाचित् –
गाभाऱ्यात तेवणारी शांत ज्योत
तोलून धरील अंधार.
नचपेक्षा–
आश्रितांना आराधनेचे सदैव उघडे दार...

## पाऊस

एक कविता लिहिली.
समोर राहत असलेल्या तिला दाखवावी
म्हणून बाहेर आलो, तो मातीचा मत्त गंध
मेंदूत जाऊन भिनला.
– बहुधा पहिला पाऊस सुरू झाला असावा.
मी जाम खूष.
चार दोन टपोरे थेंब अंगावर;
आणि कदाचित चुकून
एखादा माझ्या हातातील कवितेवरही.

घाईने रस्ता ओलांडून पडवीत गेलो.
सहज कवितेचा कागद पाहिला.
पहिल्या ओळीलील ‘ फूल ’ ह्या शब्दावरून निघालेला
ओघळ थेट शेवटच्या ओळीतील
‘ जखम ’ ह्या शब्दापर्यंत जाऊन भिडला होता !

मी पुन्हा रत्यावर आलो.
पाऊस अंगावर घेत . .
मनसोक्त भिजत राहिलो...

## मातीच अंती खरी

तेजाची धरुनी मशाल दिसली सौदामिनी अंबरी;
अंधारा पडला सवाल कसला, काया अशी कापरी ?
ताऱ्यांची दुनिया मजेत फिरते आकाश त्यांचे जरी,
एखादा दमला तुटून पडला जागा तया भूवरी !
आभाळा नसते फिकीर कसली काळाही नाही मुळी.
दु:खाचे जर सैल काठ इथले, का शौर्य जाते बळी ?
पाण्याला कसली तहान, कसली कासाविसी सागरी ?
वाटा बंद तरी फुकाच फुटती लाटाहि काठावरी...
कोणाचे फसवे नशीब, फसवी कोणी कुणाला तरी;
केव्हा सापडते कधी निसटते प्रीती अशी बावरी.
मातीची ममता महान असते मायाही मातेपरी;
आशेने जगते मरून उरते मातीच अंती खरी...

## वेध

आपलेपणाने काही सांगावे
ह्यापलिकडे गेलेय आकाश.
शब्दांच्या संवेदनाही
भलत्याच तल्लख झालेल्या.

मागे पाहताना चुकून
तीक्ष्ण शब्दांचा स्पर्श
लिबलिबित भूतकाळाला झालाच तर
अवघे कर्तृत्व लडबडून जायचे
त्याच्या भळभळत्या जखमांनी... !

वाटा कितीही नागमोडी असल्या
तरी भविष्य मात्र सरळ रेषेत असते,
संदिग्ध...
आयुष्याच्या काठावर
आभाळाच्या सौजन्याने झालीच रात्र
तर अंधाराला हवा असतो निःश्वासांचा दिलासा;
आणि प्रकाशाला पहायचा असतो
वेदनांनी विझलेल्या नजरांचा तमाशा !

कसली ही कासाविस करणारी तहान ?
आकाश अद्यापही होत नाही लहान.
मग काळाचे डोळे कसे यावेत भरून ?

## संभ्रम

फुलांनी कधी फुलावे
आणि कुठे विझावे,
हे ठरविण्याचा अधिकार
प्राप्त होत नाही तोपर्यंत–
कुतूहलापोटी का होईना
वाटांविषयी साशंक असू नये...

कुठल्याशा शोधार्थ बाहेर पडताना
पाऊले अजमावून
एखादा मागोवा घेत निघालाच तर –
वाटांना उपवाटा फुटतात
तेथे भांबावून थांबणे,
दिशांध गंधाचा अंदाज बांधून
धूर्तपणे पुढे जाणे –
सार्थकी लागेलच याची खात्री काय ?
शेवटी –
प्रेताच्या वाटेवर सांडलेल्या
अथवा प्रीतीच्या मार्गात मांडलेल्या
फुलांचा सुगंध –
सुगंधच असतो !

## वाटले होते

वाऱ्याचा साक्षात्कारी स्पर्श
आणि अर्धवट जळालेल्या स्वप्नांचा
घुसमटून टाकणारा वास...
श्वासांनाही एव्हाना कळले असावे
माझ्या सोसण्याचे सामर्थ्य.
आणि म्हणून –
फुलांनी सुवासाच्या दिलाशाचा
काढलाय फतवा.
आता तर कसलाही गंध
नकोसा झालाय.
पहिल्या पावसाची सर ओसरल्यावर
सुटणाऱ्या मातीचा देखील.
– त्या गंधानेच मोह अंकुरताना
आयुष्य वाटले होते सलील !

## सभोवती

सायंप्रार्थनेचे क्षितिज ओलांडून
व्यथा अस्तावू लागल्या
की मन होते आकाश.
– त्या पारदर्शी निर्मळ पोकळीत
आपले रंगांबर अस्तित्व
एखाद्या वांझ ढगाप्रमाणे
तरंगू लागते...

संदिग्ध संधिप्रकाशात –
सगळ्या शक्यतांची टोके
जाणिवेला जुल्मून टोचत राहतात...

अपरिहार्यपणे दाटत जाणाऱ्या अंधारावर
मंदिरातील घंटेचा मंदावत जाणारा नाद
स्वप्नांकित वलये उमटवू लागला,
म्हणजे आभाळाने ढग चाचपून पहावा
तसे अस्तित्व शोधू लागते –
दरवेशी आयुष्य...

## श्रद्धाळू

भर उन्हातून जाताना
ती डोळ्यांत सावल्या साठवीत गेली.
पुढे तिला भेटला अंधार.
तिने विचारले, ‘ प्रकाश कुठाय ?’
तेव्हा रात्र फिसकन् हसली,
निबर काळ्या ओठांतून ताऱ्यांचे दात दाखवीत.
ती घाबरली.
निघतानाच मी तिला बजावले होते :
अगदीच निराधार झालीस तर
स्वप्नांना बोलाव सोबतीला.
तसे सुरवातीलाच मी तिला
पुष्कळ काही सांगितले होते.
उदा. उन्हातून जाताना गॉगल वापरावा.
पावसात छत्री
झालेच तर थंडीत स्वेटर वगैरे.
पण ती पडली भोळी कळी !
खुलण्याची मोठी हौस.
एवढे मोठे आभाळ पाहून
दिलान् काय सारा सुगंध उधळून...
आजुबाजूचे अजागळ गवतही
हसत राहिले तिच्या मूर्खपणाला.
तिचे काय झाले हे पहावे म्हणून
मी जय्यत तयारीत निघालो.
बागेपाशी येतो न यतो तोच –
सुगंधाची एक हलकी लहर अंगावरून गेली.
तिच्या रोखाने, स्वतःला सावरीत, आत गेलो.

डहाळीवर लटकत होता फक्त देठ.
खाली सर्वत्र गळून पडलेल्या पाकळ्या...
त्या गोळा करू लागलो,
तो तेथल्या कावेबाज काट्यांनी
पाय रक्तबंबाळ केले...
आता कुठे लक्षात आले –
आपण उगाच एवढे श्रद्धाळू झालो
आणि बागेबाहेर चपला ठेवून आत आलो...

## हरवलेले चेहरे

चेहरा हरवलेल्यांची गर्दी –
अपघातात सापडलेल्याचा चेहरा ओळखण्यासाठी !
उंच टाच करून डोकावणे, पुढ सरकणे...
निर्विकारपणे चाललेला पंचनामा...
चेहरा पूर्णतः चेपला गेल्याने
कपडे, चपला, चष्मा, खिसे इ. ची तपासणी.
घशाखाली आणि मेंदूवर
काहीही परिणाम करून न घेता
एकजण वाचतो –
मृताच्या खिशात सापडलेली चिठ्ठी.
बहुधा, अर्धवट लिहिलल्या कवितेच्या
चार–दोन ओळी...
– भविष्याचा वेध घेण्यापूर्वीच
वर्तमानाने कापलेले कवितेचे पाय...
ह्या छिन्न विछिन्न मेंदूत –
काही वेळापूर्वी पेटली असेल एखादी कविता.
शेवटी कविता म्हणजे तरी काय ?
निळे–काळे रक्त !
– त्या थिजलेल्या रक्ताचे काजळ
गर्दीतल्या प्रत्येकाच्या डोळ्यांत रेखले
तर सापडतील का त्यांना
त्यांचे हरवलेले चेहरे ?

## इमान

स्मशानाला स्पर्शून
बावटळ वहात गेली, म्हणजे
उडून जावेत उरले सुरले राखेचे कण;
तसे –
सर्जनोत्सुक काळाने प्रसवलेले क्षण संपतात
मुर्दाड भूतकाळात विलीन होऊन...

अकाली झालेल्या गर्भपाताप्रमाणे
एखादा अपरिपक्व दिवस पडला
लोळागोळा होऊन,
तर चांदण्याचे काय होईल ?
कोठे दडेल दाटलेला अंधार शरमून ?

अनंत प्रश्न पांघरून
कबरीतल्या अचल एकांतात
क्रियापदांचा कोंडमारा होत असताना –
उरलेल्या स्तब्ध शब्दांतून
उमटतील का वेदनेचे निनाद,
जगल्या जखमेला जागून ?

## विप्रलंभ

आसमंतात धुळीचे लोट
आणि रस्त्यावर उमटलेल्या
बऱ्याचशा पाऊलखुणा;
एवढ्याच विश्वासार्ह बाबी
काफिला निघून गेल्याच्या.

हा वर्तमानही तिष्ठत राहिलाय
सगळे मोसम गोठवून,
तेव्हापासून...

मधूनच आठवणी आभाळून येतात
नि पागोळत्या स्मृती
प्रेमोत्कट मातीत टपटपत राहतात,
माझ्या अस्तित्वाची ग्वाही देत ..

– काय अंकुरेल आता मातीतून
ह्या विवंचनेने मी मुखस्तंभ;
आणि रस्त्यावरच्या पाऊलखुणा कुरवाळताना
वर्तमान...विप्रलंभ !

## मोर

मागे पडत गेलल्या पाऊलखुणांचे आठव
आसवांना अकारण अर्थ देत बसतात,
केवळ संदर्भ म्हणून
बदलत जाणारे ऋतू
आडवळणाने चालत येतात,
तेव्हा तोल सावरणेही
होऊन बसते कठीण !
योजलेले आडाखे
धुक्यासारखे विरत जातात;
अणि स्वच्छ प्रकाशात
दुर्दम्य सत्य उभे ठाकते समोर.
अशावेळी वाटते –
प्राक्तनाच्या तालावर
अश्रू ढाळीत
कसा नाचत असेल मोर ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३३७०
दा. क. २३.९.९०
काव्य ९१॥३१२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## वंचित

REFBK-0023490
REFBK-0023490

आपल्याच संचिताला वंचति झालेले पांढुरके ढग
वाऱ्याच्या इशाऱ्यावर
दीनवाणे भरकटू लागले
की वाटते –
ह्या अमोघ आयुष्यावर
आपण फक्त स्वप्नांची बरसात करीत रहावे
दिलदार होऊन.
पण माझ्या वर्मावर बोट ठेवून,
बाष्प, मेघ, पाऊस, नाले, नद्या तो थेट
सागरापर्यंतचा अपरिहार्य प्रवासाचाच
ती विचार करते
स्वतःचे रितेपण लपवून !
वास्तविक –
अटळाच्या कातळावर कोसळण्यापूर्वी
मी नाकारले नव्हते कोणतेच स्थित्यंतर
आकाशाचा अमर्याद पदर धरून;
आणि त्यांच्या सामजस्याने उजळून निघून...
तरीही –
आभाळ भरून आल्यावर
लखकन् चमकून गेलेल्या विजेच्या प्रकाशाने
तिची संयमी नजर जाते पार फाटून
जेव्हा जर्जर अंधार
उभा असतो दाराशी झोळी पसरून.